कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे
कासारवडवली पोलीस स्टेशन.डि.मार्ट जवळ.घोडबंदर रोड,
ठाणे(प) ४००६१५, दुरध्वनी क्रमांक ०२२ –२५९७२०४०
e mail- cp.thane.kasrwadvli@mahapolice.gov.in

प्रेसनोट

कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे शहर आयुक्तालय यांनी सुमारे १८ लाख ७० हजार रुपये किंमतीचे वेगवेगळ्या कंपनीचे ७३ मोबाईल महाराष्ट्र व इतर राज्यातून शोध घेऊन नागरिकांना केले परत.
कासारवडवली पोलीस ठाणे पथकाची उल्लेखनिय कामगिरी..

आजच्या आधुनिक काळात मोबाईल ही चैनिची वस्तु न राहता गरजेची वस्तु झालेली असून दैनंदिनी व्यवहार, संपर्क, करमणुक, फोटो याकरिता मोबाईलचा अविरतपणे वापर होत असतो. मोबाईलबाबत प्रत्येक व्यक्ती खूप संवेदनशील असतो. मोबाईल हरवला, चोरी झाला अथवा गहाळ होताच संबधीत व्यक्तीची मोबाईलमधील माहिती हे ही मोबाईल सोबत गेल्याने संबंधित व्यक्तीला येण्यारे अडचणी सह त्यास दु:खही होते. व्यथित मनाने ती पोलीस ठाणे येथे मदतीकरिता येत असतात.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमधील नागरिकांचे गहाळ/ चोरी झालेल्या मोबाईल फोनचा सर्वोतोपरी शोध घेऊन ते नागरिकांना परत मिळवून देण्याबाबत **मा. श्री. आशुतोष डुंबरे सो, पोलीस आयुक्त, ठाणे शहर** यांनी ठाणे शहर यांनी या अनुषंगाने विशेष मोहिम राबविणेबाबत आदेशीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने **मा.डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण , पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर, मा. श्री. विनायक देशमुख, अपर पोलीस आयुक्त, ठाणे शहर श्री. प्रशांत कदम, पोलीस उप आयुक्त परि-५, ठाणे शहर व श्री. मंदार जावळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वर्तकनगर विभाग** यांचे मागदर्शनाखाली कासारवडवली पोलीस ठाणेचे **वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निवृत्ती कोल्हटकर** यांनी नागरिकांचे चोरी / गहाळ झालेले मोबाईल फोनचा शोध घेऊन ते नागरिकांना परत मिळवून देणेकरिता **पोलीस उप निरीक्षक सौरभ थोरवे, पोशि/२६४७ कृष्णकांत भगत** यांचे एक विशेष पथक तयार केले. CEIR (Central Equipment Identity Register) या पोर्टलव्दारे गहाळ झालेले मोबाईल ट्रेस करुन गहाळ झालेले मोबाईल हे ठाणे शहर आयुक्तालयसह महाराष्ट्रातील वेगवेगळे जिल्हे तसेच पुर्ण देशभरामधुन ट्रेस झालेले मोबाईल जे व्यक्ती वापरत आहेत किंवा ज्यांच्या ताब्यात आहेत त्यांचेशी संपर्क करुन मोबाईल परत करणेबाबत सांगितले असता महाराष्ट्रासह इतर राज्यातून काही मोबाईल परत मागविले. अनेक मोबाईल प्रत्यक्ष जावुन त्या ठिकाणावरुन हस्तगत करण्यात आले.

मागील कासारवडवली पोलीस ठाणेकडून सुमारे १८ लाख ७० हजार रुपये किंमतीचे वेगवेगळ्या कंपनीचे ७३ मोबाईल हस्तगत करण्यात आले असून यापुढेही अशीच मोहिम राबवून नागरिकांचे गहाळ/ चोरी झालेले मोबाईल परत करण्याची कार्यवाही चालू आहे. नागरिकांना मोबाईल परत मिळाल्याने आनंदी होवुन त्यांनी पोलीसांप्रती समाधान व्यक्त करुन ठाणे शहर पोलीसांचे आभार मानले आहे.

सदरची कामगिरी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली कासारवडवली पोलीस ठाणेकडील **वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. निवृत्ती कोल्हटकर, पोलीस उप निरीक्षक सौरभ थोरवे, पोशि/२६४७ कृष्णकांत भगत** यांनी केली आहे.

----------++++++++++++++----------

Scanned with OKEN Scanner